# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव

फोन ०२५७-२२२३७९० फॅक्स ०२५७-२२२०५११

Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र- १२२ दिनांक :- ०४/०९/२०२६

## " चोरीची मोटारसायकल विक्रीचा डाव उधळला; दोघे जिल्हापेठ पोलिसांच्या ताब्यात, मोटारसायकल जप्त "

**जळगाव शहर पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंगदरम्यान मिळालेल्या विश्वसनीय गोपनीय माहितीच्या आधारे तत्काळ कारवाई करून चोरीची बजाज पल्सर मोटारसायकल विक्री करण्याच्या उद्देशाने फिरत असलेल्या दोन इसमांना जिल्हापेठ पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून चोरीची बजाज पल्सर मोटारसायकल जप्त करण्यात आली असून, सदर मोटारसायकल शनीपेठ पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या चोरीच्या गुन्ह्यातील असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.**

दिनांक ०३/०९/२०२६ रोजी दुपारी सुमारे १२.३० वाजता जळगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार पो.हे.कॉ./३०६८ किरण पंढरीनाथ वानवडे व पो.कॉ./२०९७ प्रविण राजेंद्र जाधव हे जिल्हापेठ पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना, **कांताई नाट्यगृह परिसरात दोन इसम चोरीची बजाज पल्सर मोटारसायकल विक्री करण्याच्या उद्देशाने फिरत असल्याची** विश्वसनिय **गोपनीय माहिती** मिळाली. मिळालेल्या माहितीची खात्री करून पोलिसांनी तत्काळ कांताई नाट्यगृह परिसरात जाऊन पाहणी केली असता, **दोन इसम विनाक्रमांकाची बजाज पल्सर मोटारसायकल घेऊन संशयास्पदरीत्या फिरताना** आढळून आले. पोलिसांनी त्यांना थांबवून मोटारसायकलबाबत कागदपत्रे व मालकी हक्काची माहिती विचारली असता, त्यांनी समाधानकारक माहिती दिली नाही.

त्यानंतर पोलिसांनी अधिक चौकशी केली असता त्यांनी आपली नावे **१) मनोज दत्तू चौधरी, वय २४ वर्षे, रा. ज्ञानदेव नगर परिसर, जुना खेडी रोड, जमुना नगर, जळगाव २) सुमित शंकर चौधरी, वय ३१ वर्षे, रा. श्रीराम चौक, हरिओम नगर, जळगाव** अशी सांगितली

### RTO तपासणीत चोरीचा प्रकार उघड

पोलिसांनी ताब्यातील मोटारसायकलीचा **चेसीस क्रमांक MB२B६८BX०NWC१८५६८** व **इंजिन क्रमांक DHXWNC५८०६६** यांच्या आधारे तात्काळ RTO ॲपवरून वाहनाची माहिती तपासली असता, सदर मोटारसायकलचा नोंदणी क्रमांक **MH-१९-DY-७४५८** असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर अधिक चौकशीकरत वाहनाच्या मालकाबाबत माहिती घेऊन संबंधित वाहनमालकाशी संपर्क साधला असता, **सदर बजाज पल्सर मोटारसायकल चोरीस गेल्याबाबत शनीपेठ पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र. ८९/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले.**

त्यानुषंगाने दोन्ही इसमांना व चोरीची मोटारसायकल **पुढील कायदेशीर कारवाईसाठी शनीपेठ पोलीस स्टेशनच्या ताब्यात दिले आहे.**

**" नागरिकांनी अनोळखी व्यक्तींकडून कमी किमतीत किंवा संशयास्पद पद्धतीने वाहने खरेदी करण्यापूर्वी वाहनाची कागदपत्रे, नोंदणी क्रमांक, चेसीस क्रमांक तसेच मालकी हक्काची खात्री करूनच व्यवहार करावा. चोरीच्या वाहनांच्या खरेदी-विक्रीबाबत अथवा कोणत्याही संशयास्पद वाहनाबाबत माहिती मिळाल्यास नागरिकांनी ती तत्काळ जवळच्या पोलीस ठाण्यास कळवावी. चोरीच्या वाहनांच्या गैरव्यवहाराला आळा घालण्यासाठी नागरिकांनी सतर्क राहून पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन असे मा. पोलीस अधीक्षक श्री श्रीकांत धिवरे यांचेकडून नागरिकांना करण्यात येत आहे "**

सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री श्रीकांत धिवरे, श्री. संदीप गावीत, अपर पोलीस अधीक्षक, श्री. नितीन गणापुरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, जळगांव विभाग यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हापेठ पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी श्री. अनिल वाघ यांच्या नेतृत्वाखाली पो.हे.कॉ./३०६८ किरण पंढरीनाथ वानखडे व पो.कॉ./२०९७ प्रविण राजेंद्र जाधव यांनी उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

**SD/-**
**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव**

**प्रति,**

**सर्व संपादक/वार्ताहार**
**प्रिंट मिडीया/इलेक्ट्रॉनिक मिडीया**
**२/- जनहितार्थ प्रसारण करीता**

***************************************************************************************




Hero